# ESIC च्या "अटल बीमित व्यक्ति कल्याण योजना" (एबीवीकेवाय) ची ओळख



## कामगाराच्या प्रतिष्ठेची सुरक्षितता
## त्यांच्या आर्थिक सुरक्षिततेची खात्री करुन घेणे

सत्यमेव जयते

कामगार आणि रोजगार मंत्रालय
भारत सरकार

क.रा.बी.नि. ESIC सामाजिक सुरक्षा SOCIAL SECURITY

कर्मचारी राज्य विमा महामंडळ

**अटल बीमित व्यक्ति कल्याण योजना (एबीवीकेवाय):** ही योजना 1948 च्या ESI कायद्याच्या कलम 2(9) अंतर्गत समाविष्ट कर्मचाऱ्यांसाठी ESIC द्वारे प्रशासित एक कल्याणाचा उपाय आहे, यामध्ये जीवनकाळात एकदा, 90 दिवसांपर्यंत मदत रक्कमेच्या स्वरुपात हा उपाय केला जातो. ही योजना 01-07-2018 पासून आरंभी दोन वर्षे कालावधीसाठी पथदर्शी तत्वावर सुरु करण्यात आली होती. ही योजना आता आणखी एक वर्षासाठी म्हणजे 1 जुलै, 2020 ते 30 जून, 2021 साठी वाढविण्यात आली आहे. या योजनेखालील बेरोजगार भत्त्याचा दरही पूर्वीच्या 25 टक्के दरावरुन 50 टक्केपर्यंत वाढविण्याचे ठरविण्यात आले आहे सोबत पात्रतेच्या अटींमध्ये सवलत दिली आहे, तथापि विमाधारक तो/ती बेरोजगार होण्याच्या लगेच आधी दोन वर्षे किमान कालावधीसाठी विमायोग्य रोजगारात असणे आवश्यक आहे आणि बेरोजगारीच्या लगेच आधी अंशदान कालावधीमध्ये किमान 78 दिवसांकरिता त्याने अंशदान केले असले पाहिजे आणि बेरोजगारीच्या आधी दोन वर्षांमध्ये उर्वरित तीन अंशदान कालावधींपैकी एकामध्ये किमान 78 दिवस अंशदान केले असले पाहिजे. एका लक्षणीय सवलतीद्वारे, बेरोजगारीच्या तारखेपासून 30 दिवसांनी भत्ता देय राहील आणि दावा कामगाराद्वारे निर्धारित ESIC शाखा कार्यालयाकडे थेट सादर करता येईल. वाढीव लाभ आणि सवलतीच्या अटी 24 मार्च 2020 ते 31 डिसेंबर 2020 कालावधीदरम्यान लागू राहतील. भत्ता मिळण्यासाठी दावे ऑनलाईन www.esic.in या वेबसाईटवर करता येतील सोबत प्रत्यक्ष दावा एका शपथपत्रासह सादर करावा, आधार कार्डची छायाप्रत आणि बँक खाता तपशील निर्धारित ESIC शाखा कार्यालयाला टपालाने किंवा व्यक्तिशः पाठवावेत. दाव्याची पडताळणी आणि विमाधारक व्यक्तिच्या (IP) बँक खात्यामध्ये रक्कम जमा करण्याची संपूर्ण प्रक्रिया 15 दिवसांच्या आत पूर्ण केली जाईल.

## अटल बीमित व्यक्ति कल्याण्य योजने अंतर्गत

**कामगारांसाठी आता मदत रक्कम दुप्पट केली आहे**

**कामगारांच्या बँक खात्यात रक्कम थेट जमा**

**पात्रता निकषात सूट**

**www.esic.in येथे कामगार ऑनलाईन अर्ज करु शकतात**

# “अटल बीमित व्यक्ति कल्याण योजना (एबीवीकेवाय)”
# “वरील वारंवार विचारले जाणारे प्रश्न आणि त्यांची उत्तरे”

| अनु. क्र. | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| 1 | बेरोजगारीमध्ये विमाधारक व्यक्तिंचा समावेश होतो का ज्यांना लॉकडाउन कालावधीत मालकांकडून पगार मिळत नाही आणि ज्यांचे अंशदान 0 (शून्य) दाखवण्यात आले आहे? | नाही. |
| | ESIC चलान यादीतून IPs नावे काढून टाकणे मालकाला अनिवार्य आहे का? कारण बहुतांश प्रकरणी कामगाराचे अंशदान “0” दाखवत आहे आणि तरीही अपात्र आहे. | या योजनेखालील भत्ता केवळ त्या IPs ना उपलब्ध आहे जे बेरोजगार झालेले आहेत. एखाद्या IP ला तेव्हाच बेरोजगार समजण्यात येईल जर त्याच्या/तिच्या मालकाने त्याला/तिला मासिक अंशदान चलनामध्ये निकासित केल्याचे दाखवले असेल. जर त्या मालकाने मासिक अंशदान चलनात IP साठी “0” अंशदान दाखवले असेल तर याचा अर्थ, तो IP अद्याप त्या मालकाकडे रोजगारावर आहे आणि मालक या कर्मचाऱ्यांना थोडी रक्कम देऊ शकतो म्हणून असे कर्मचारी या योजनेखाली मदत मिळण्यासाठी पात्र नाहीत. |
| 2 | लॉकडाउनमध्ये बेरोजगार होते परंतु आता कामावर आहेत अशा IPs चा योजनेत समावेश आहे का? | असे कर्मचारी, जर आवश्यक पात्रता अटी पूर्ण करत असतील तर ते योजनेखाली मदतीसाठी पात्र आहेत. परंतु दावेदार हा दाव्याच्या कालावधीदरम्यान बेरोजगार असला पाहिजे. |
| 3 | दावेदार बेरोजगारीनंतर पहिल्या 30 दिवसांकरिता योजनेखाली दावा दाखल करु शकत नाही. | दावेदार बेरोजगार झाल्यानंतर म्हणजे मालकाने बाहेर केल्याचे दाखवल्यानंतर 30 दिवसांकरिता मदतीचा दावा दाखल करु शकतो). दावेदार त्याच्या बेरोजगारीनंतर लगेच पूर्ण केलेल्या महिन्यासाठी दावा दाखल करु शकतो. |
| 4 | यंत्रणेद्वारे दाव्याची निर्मिती म्हणजे योजनेखाली मदतीच्या रक्कमेची हमी ठरते का. यंत्रणेने दावा निर्मितीस मंजुरी दिली असली तरी दावा नाकारता येतो का? | यंत्रणेद्वारे दाव्याची निर्मिती सदर योजनेखाली मदतीच्या रक्कमेसाठी कोणतीही हमी नसते. जर शाखा कार्यालय व्यवस्थापकाने मालकाच्या नोंदींमधून दाव्याची पडताळणी करताना दावेदार अपात्र असल्याचे आढळून आले तर, तो दावा शाखा कार्यालय व्यवस्थापकाद्वारे नाकारला जाऊ शकतो तथिप अशी प्रकरणं दुर्मिळ असावीत. |

| अनु. क्र. | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| 5 | सेवानिवृत्तीचे वय किती आहे? | कोणत्याही विमाधारकाच्या सेवानिवृत्तीचे वय कायद्यानुसार कंपनीच्या पॉलिसीच्या आधारे विशिष्ट असते. ESI कायद्याच्या कलम 56 खाली दिलेल्या स्पष्टीकरणानुसार सेवानिवृत्तीचे वय साठ वर्षे घेता येते. |
| 6 | ही एक सर्वसामान्य घटना आहे की कर्मचारी नोकरी सोडण्याबद्दल कंपनीतून राजिनामा सादर करतात. असे राजिनामे देणारे कर्मचारी ABVKY खाली मदतीसाठी पात्र असतात का? | आपला राजिनामा सादर करणारे कर्मचारी बेरोजगार समजण्यात येतील आणि जर अन्यथा पात्र असतील तर त्यांना योजनेखाली मदत देता येऊ शकते तथापि त्या मालकाने नोकरीतून राजिनामा देताना/नोकरी सोडताना कोणताही रिट्रेंचमेंट लाभ/आर्थिक भरपाई भरलेली नसेल. |
| 7 | कर्मचाऱ्यांना भरपाईची रक्कम देण्यासाठी ABVKY अंतर्गत लॉकडाउन (सरकारी आदेशाद्वारे मालकावर लादलेली तात्पुरत्या स्वरुपातील टाळेबंदी) हा एक पात्रता घटक असू शकतो का. | नाही. ABVKY खालील मदत ही लॉक-डाउन किंवा लॉक-आउट च्या प्रसंगात ग्राह्य नाही कारण लॉक-आउट/लॉकडानच्या कालावधीत मालकाने कर्मचारी कामावर ठेवणे चालू ठेवले होते. |
| 8 | दाव्याच्या पडताळणी दरम्यान कर्मचाऱ्याची बेरोजगारीबाबत चौकशी करणे आवश्यक आहे आणि त्याच्या बेरोजगारीसंदर्भात कोणतेही घोषणापत्र घेणे आवश्यक आहे का. | कर्मचाऱ्यांकडून कोणतेही घोषणापत्र घ्यावयाचे नाही (बेरोजगार माजी-IP). कर्मचाऱ्याची चौकशी करणे देखील टाळावे. माजी-IP ची सर्व आवश्यक माहिती पडताळणीच्या वेळी मालकाकडून प्राप्त करता येईल. |
| 9 | पडताळणीदरम्यान मालक दाखवतो की कर्मचाऱ्याने नोकरी सोडली आहे किंवा राजिनामा दिला आहे किंवा स्वेच्छा निवृत्ती घेतली आहे. | कर्मचारी हे बेरोजगार समजले जातील, आणि जर अन्यथा पात्र असतील तर त्यांना योजनेखाली मदत देता येईल तथापि मालकाने राजिनामा/नोकरी सोडतेवेळी कोणताही रिट्रेंचमेंट लाभ/आर्थिक भरपाई भरलेली नाही. |
| 10 | जर EPF अंशदान बेरोजगार कर्मचाऱ्याच्या बाबतीत भरले असेल तर, त्या कर्मचाऱ्याला बेरोजगार समजायचे का. | नाही.<br>जर पडताळणीदरम्यान आढळून आले की EPF अंशदान त्या कर्मचाऱ्याच्या बाबतीत भरलेले आहे तर, त्या कर्मचाऱ्याला बेरोजगार समजण्यात येणार नाही. |

**अधिक माहितीसाठी, ईएसआयसी शाखेशी किंवा टोल फ्री क्रमांक 1800 11 2526 वर संपर्क करा**